2022-23

डॉ. गौतम जाधव
जिमखाना विभाग
दि. २२ जून २०२२

मा. प्राचार्य सो
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
जि. पुणे ४१३१०२.

विषय : आंतरराष्ट्रीय योग दिन अहवालाबाबत.

महोदय,

२१ जून, २०२२ रोजी आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे दिशानिर्देशानुसार महाविद्यालयात आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन जिमखाना विभाग, योगशास्त्र विभाग, एन. एस. एस, एन. सी. सी व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ६.३० ते ८.०० या वेळेत करण्यात आले होते. या योग दिनाच्या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला होता.

या योगदिन कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांचे शुभहस्ते करण्यात आले यावेळी उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे व डॉ. रामचंद्र सपकळ उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील योगा विषयाचे प्रा. आर. डी. जगताप यांनी सर्व उपस्थितांना प्रथम विविध आसने व प्राणायामाची प्रात्यक्षिके दाखविली व शरीरावर होणारे त्यांचे फायदे याबद्दल माहिती देऊन सर्वांकडून त्याचा सराव करून घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गौतम जाधव यांनी केले तर प्रा. अशोक देवकर यांनी आभार व्यक्त केले. तरी आपल्या माहितीसाठी कळवित आहे.

कळावे,
Noted
IQAC / VB

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: 56-77
दिनांक: 22 JUN 2022

20/06/22

आपला विश्वासू

डॉ. गौतम जाधव




Department of Psychology and Yoga Celebrated World Yoga Day at Gymkhana
21 June 2022